# Revenue Department:

| **अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-** | |
|---|---|
| **1)** | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. .( Activation लिंक ही २ दिवसांकरिता activate असेल.). उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल<br><br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल . |
| **2)** | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| **3)** | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान 3 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| **4)** | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी. |
| **5)** | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.<br><br>उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे . जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी .<br><br>उमेदवार जर ST प्रवर्गात मोडत असेल तर त्यास तो ST-PESA प्रवर्गामध्ये अर्ज करू इच्छितो का नाही याची निवड करावी लागेल. उमेदवार हा एका वेळी फक्त एका जिल्हासाठी अर्ज करू शकतो. जर आपण ST-PESA प्रवर्गातुन अर्ज करत असाल तर आपण फक्त आपल्या ST-PESA जिल्हाच्या विभागासाठी अर्ज करू |

| | |
|---|---|
| | शकता दुसऱ्या कुठल्याही विभागाकरिता ST-PESA मधून अर्ज करू शकत नाही. जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आल्यास त्याचा कालक्रमानुसार पहिला अर्ज ग्राहय धरण्यात येईल. |
| **6)** | उमेदवाराने तलाठी या पदाक रिता अर्ज करत असताना त्याला ज्या जिल्हयाच्या पदाकरिता अर्ज करावयाचा आहे तो जिल्हा काळजीपूर्वक निवडणे गरजेचे आहे. (इथे निवडत असलेला जिल्हा आणि तुम्ही तुमच्या पत्त्यामध्ये निवडत असलेला जिल्हा यांचा कुठलाही संबंध नाही.)<br>उमेदवाराने खाली नमूद केलेल्या फील्ड करीत जिल्हयाची निवड करावी.<br>**English:"Please select the district you want to apply: "**<br>**Marathi: "आपण अर्ज करू इच्छित असलेला जिल्हा निवडा."**<br>येथे यादीमध्ये निवड करण्यासाठी उपलब्ध असलेले जिल्हे हे जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे रिक्त पदांचा विचार करून दाखवण्यात आलेले आहेत, कृपया जाहिरात वाचून जिल्हयाची निवड करावी . |
| **6)** | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . |
| **7)** | तसेच मराठीभाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य , अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास ) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| **8)** | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| **9)** | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक रावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **10)** | आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल.( तलाठी/ Talathi) |
| **11)** | त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| **12)** | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एक परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास , उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| **13)** | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेट बँकिंग , क्रेडिट कार्ड /डेबिट कार्ड , भीम UPI ) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| **14)** | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री 11.59 वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| **15)** | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर 18003000 7766 वर कॉल करा.<br>**<u>नोंद :-</u>** नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, पदासाठी निवड केलेला जिल्हा इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | |
| **1)** | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| **2)** | अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद :उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा. |
| **महत्त्वाच्या सूचना:** | |
| | १)उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>२) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>३) उमेदवार जे वेगवेगळे विभाग/ वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग /पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी . अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र /शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>४)उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रांपैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | ५) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>६) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही . |